


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : ७६४. वा | मंगळवार | दि. ०७ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# आरोग्य उपसंचालक भंडारेंचेही आता कानावर हात...

## जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणी म्हणे राज्याचेच अधिकारी निर्णय घेतील...

**पोस्टमार्टम ७८**

**भ्रष्टाचारातून करोडो रुपयांची जमवलेली चल अचल संपत्ती / अपसंपदाचीमिळालेली माहिती लवकरच आयकर विभाग व लाचलुचपत विभागाकडे तक्रारकर्ते पूर्ण पुराव्यानिशी देणार असल्याचे कळते**

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयातील शेकडो कोटी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी अधिकारी किती अक्षम्य टाळाटाळ करीत आहेत, हे आता स्पष्टपणे समोर येऊ लागले आहे. या भ्रष्टाचार प्रकरणी नवनियुक्त आरोग्य उपसंचालक भंडारे यांना माहिती विचारली असता, त्यांनी राज्यस्तरावरील वरिष्ठ अधिकारीच याबाबत निर्णय घेतील, असे थातूरमातूर उत्तर भंडारे यांनी दिले. वस्तुतः भंडारे यांनी स्वतः या ठिकाणी झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी केली होती, त्याचे काय झाले, हे सांगण्यासही भंडारे यांनी टाळाटाळ केल्याने या भ्रष्टाचाराचे पाळेमुळे किती दूरवर पसरली आहेत, याचा अंदाज येऊ लागला आहे. येथील जिल्हा रुग्णालायत बोकाळलेल्या करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरणी गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन वृत्तमालिका प्रकाशित करून भ्रष्टाचाराचा भंडाफोड करीत आहे. खरे तर या प्रकरणी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनने जो काही पुढाकार घेतला आहे, त्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कौतुकाची थाप पडणे गरजेचे आहे. मात्र, खालपासून वरपर्यंत अनेक अधिकारी यामध्ये सामिल असतील, तर मग एका निर्भिड वृत्तपत्राची प्रशंसा करणार तरी कोण? सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने हा प्रयत्न करीत आहे की, जिल्हा रुग्णालयातील घोटाळेबाजांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. मात्र, या ठिकाणी वारंवार चौकशा करण्यात येत आहेत. कधी उपसंचालक स्तरावर चौकशी, कधी आयुक्त पातळीवर चौकशी तर कधी आणखी कोणत्या पथकाकडून चौकशी. केवळ चौकशांचा बाजार भरलेला आहे. परंतु एकाही चौकशी समितीचा अहवाल समोर येत नाही, एकाही चौकशी समितीत घोटाळ्याची सविस्तर माहिती समोर येत नाही. एकाही भ्रष्ट अधिकाऱ्यावर कारवाई होत नाही. केवळ चौकशी समिती येते, चौकशीचा बनाव करते, अधिकारी या ठिकाणी येऊन मजा मारतात, मेजवान्या झोडतात आणि जाताना बरेच काही घेऊन देखील जातात, त्यामुळेच या भ्रष्टाचाराची खरी स्थिती समोर येत नाही. आतापर्यंत जेव्हढ्या चौकशा झाल्या, त्यातील एकाही चौकशीचा अहवाल शासनाला गेला नाही आणि कोणावरही कारवाई झाली नाही. असे असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने या विषयाला घेऊन पाठपुरावा करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून अकोल्याचे आरोग्य उपसंचालक भंडारे साहेब यांना दैनिक जनसंचलनने विचारणा केली. खरे तर खुद्द भंडारे यांनी काही दिवसांपूर्वी या भ्रष्टाचाराची चौकशी केली होती. त्यांनी त्या चौकशीत काय सापडले, कितीचा गैरव्यवहार सापडला आणि त्यासंदर्भात आपण काय शिफारसी केल्या, हे सांगणे अपेक्षित होते. मात्र, भंडारे दुसऱ्या चौकशी समित्यांच्या मुद्द्याच्या आड दडण्याचा प्रयत्न करीत आहेत. राज्यस्तरीय समितीने चौकशी केली असून, यासंदर्भात राज्यस्तरावरील अधिकारीच काहीतरी निर्णय घेतील. त्यांच्या निर्णयावरून मग आम्ही कारवाई करू, असे सांगितले. तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तडस आणि डॉ. पंडित यांच्या विषयी प्रश्न विचारला असता, भंडारे यांनी फोन अक्षरशः टाळण्याचा प्रयत्न केला. यावरून हे स्पष्ट आहे की, भंडारे हे देखील आपली कातडी वाचवण्याचा प्रयत्न करीत आहेत. जिल्हा रुग्णालयातील औषधी व साहित्य उपकरणांचा करोडो रुपयांचा घोटाळा हा इतका सखोल आणि इतका व्यापक आहे की, या भ्रष्टाचाराच्या भंडाऱ्यामध्ये अनेक अधिकाऱ्यांनी अक्षरशः अजीर्ण होईस्तोवर खादाडलेले आहे. अनेक अधिकाऱ्यांनी या भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत लोळून घेतलेले आहे. अनेकांनी या भ्रष्टाचाराच्या पैशांमधून स्वतःच्या अवैध चल अचल संपत्ती जमवल्या आहेत. यातील अनेक अधिकाऱ्यांच्या अवैध संपत्तीची माहिती व कागदपत्रे फोटो,चित्रीकरण, सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडे प्राप्त असून, येत्या काही काळात त्याबाबत योग्य तो खुलासा केला जाईल. त्यामुळे अनेकांसाठी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचा हा भंडारा चांगलाच घातक ठरणार आहे. जोपर्यंत या भ्रष्टाचारात आकंठ बुडालेल्या अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करून त्यांना गजाआड केले जात नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आपली भ्रष्टाचारविरोधी कणखर भूमिका कायमच राहणार आहे.





अजून बरेच काही पुढील भागात...

# प्रथमच विदर्भात साकारते चित्रपट सृष्टी आता सिंदखेडराजात होणार सिनेमांची शूटिंग...

## निर्माते सुनील शेळके यांचे अथक परिश्रम...

**जनसंचलन/ सिंदखेड राजा**

विदर्भाची उपराजधानी समजल्या जाणा-या मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे राजमाता राष्ट्रमाता आईसाहेब जिजाऊ जन्मस्थळी प्रथमच चित्रनगरी अथर्थात सिनेमा सृष्टी उभी राहत आहे. मोती तलाव जवळ निसर्ग रम्य ठिकाणी निर्मात सुनील शेळके यांच्या अथक परिश्रमाने चित्रपट सृष्टी उभी राहत आहे, त्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. गेल्या एक महिन्यापासून असंख्य कामगार येथे राबताना दिसून येत आहे. चित्रपट सृष्टी म्हटली म्हणजे आपल्या डोळ्यासमोर मुंबई लोणावळा यासह अन्य स्थळे उभे राहतात परंतु प्रथमच आपल्या मायभूमीत निर्माते सुनील शेळके यांनी मोठे धाडस व हिम्मत दाखवून जिजाऊच्या जन्मस्थळ असल्याचे सिंदखेडराजा निवडले या चित्रनगरीमुळे बुलढाणा जिल्ह्यातील स्थानिक कलाकारांना विविध सिनेमांमध्ये काम करण्याची संधी प्राप्त होणार आहे तसेच स्थानिक कामगारांना तिथे काम मिळणार आहे या निमित्ताने रोजगाराच्या अनेक संधी प्राप्त होणार आहे निर्माते सुनील शेळके यांच्या कल्पक व दूरदृष्टी कोणातून हा फार मोठा भव्य प्रकल्प उभा राहत आहे जेणेकरून सिनखेडराजा नगरीतील वैभववात भर पडणार आहे. या चित्रपटसृष्टीमुळे एकंदरीत सिनखेडराजा परिसराला अनेक दृष्टीने फायदा होणार आहे बुलढाणा जिल्ह्याच्या कला सांस्कृतिक व्यापार व पर्यटन क्षेत्रामध्ये यामुळे मोठी भर पडणार असून जिल्ह्याचा नाव लौकिक हा देशभर होणार आहे तसेच जिल्ह्यातील तरुणांना रोजगार अनेक संधी उपलब्ध होणार आहे निर्माते सुनील शेळके व काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस जयश्रीताई शेळके यांनी गेल्या अनेक वर्षापासून १२ जानेवारी जिजाऊ जन्मोत्सव साठी सिंदखेडराजा येथे राज्यस्तरीय कृषी संमेलन घेतात कोणताही प्रकल्प कोणताही विषय राजमाता जिजाऊ यांचे दर्शन घेऊन सिंदखेडराजा येथून सुरू करण्याची शेळके दांपत्याची परंपरा आहे. निर्माते सुनील शेळके यांनी दोन वर्षांपूर्वी उपजिल्हाधिकारी पदाचा राजीनामा दिला आणि आपण इतरांसाठी समाजासाठी काही केले पाहिजे हा मोठा निर्णय त्यांनी घेतला सिंदखेड राजा सुशिक्षित बेरोजगार यांना नोकरी देण्यासाठी मिळावे घेतले जिल्हाभरात त्यांचे विविध उपक्रम सुरू असतात सिनेमासृष्टीत पाऊल ठेवण्याच्या त्यांचा निर्णय निश्चितच बुलढाणा जिल्ह्याच्या विकासात भर टाकेल एवढा मोठा आहे. महात्मा फुले यांच्या जीवनावर सत्यशोधक हा सिनेमा त्यांनी काढला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर महापरिनिर्वाण हा सिनेमा त्यांचा येत आहे सध्या काम सुरू आहे सिनेमा सृष्टी सुद्धा त्यांनी इतर निर्मातिपेक्षा वेगळे विषय घेऊन त्यांचा वेगळ्या अँगलने काम सुरू केले त्याला यश असल्याचे चित्रसुद्धा दिसून येत आहे निर्माते सुनील शेळके यांच्याशी संपर्क साधला असता राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ साहेब आमची अस्मिता असून या स्थळाचे जगभरात महत्त्व वाढावे म्हणून आमचा हा प्रामाणिक प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले भविष्यात या ठिकाणी देशभरातील चित्रपटाचे चित्रीकरण केले जाईल त्यामुळे बुलढाणा जिल्ह्याचा लौकिक नक्कीच वाढेल असेही ते म्हणाले



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दीड लाख किमतीचे लोखंडी असारी लंपास...

**जनसंचलन/मोताळा**

पुलाचे बांधकाम करण्यासाठी लागणारी लोखंडी आसारी रखवालदाराचे हातपाय बांधून अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना १ मे रोजी पहाटे सिंदखेड शिवारात घडली. याबाबत पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सिंदखेड शिवारात पुलाच्या बांधकामासाठी लागणारे सिमेंट, आसारी यासह बांधकाम साहित्याच्या रखवालदारीचे काम पिंपळगाव देवी येथील मधुकर नारायण जवरे हे करतात. ३० एप्रिलच्या रात्री पहारेकरी आले अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा झोपलेले होते. दरम्यान सव्वा बारा वाजेदरम्यान चार अज्ञात चोरट्यांनी रूमालाने जवरे यांचे डोळे झाकले. तसेच हातपाय रूमालाने बांधून एक चोरटा त्यांना धरून बसला व इतर ३ चोरट्यांनी २५ क्विंटल लोखंडी आसारी अंदाजे १ लाख ४० हजार रूपये किंमतीची वाहनातून लंपास केली.



याप्रकरणी तक्रारीवरून धामणगाव बढे पोस्टेला अज्ञात चार चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# रेल्वेत राहिलेले दागिने केले परत

**जनसंचलन/ शेगाव**

रेल्वे प्रवासात सात लाख रुपयांच्या दागिन्यांची पर्स विसरलेल्या महिला प्रवाशाला ती शेगाव स्थानकात ताब्यात घेऊन परत करण्यात आली. त्यासाठी शेगाव रेल्वे पोलिसांनी प्रयत्न केले. सावळ येथील सातारा फैलातील रहिवासी ममता संदीप जैन या पुणे काजीपेठ एक्स्प्रेसने सहकुटुंब भुसावळ येथे उतरल्या. त्यानंतर दागिन्यांची लेडीज पर्स ट्रेनमध्ये विसरल्याचे लक्षात आले. त्यांनी त्वरित भुसावळ येथे तैनात एएसआय दीपक तायडे यांना सूचित केले. मात्र, तोवर गाडी पुढे निघाली होती. तायडे यांनी याबाबत शेगाव स्टेशनचे आरक्षक रंजन तेलंग यांना संदेश दिला.गाडी शेगाव स्थानकात येताच तेलंग व सहकाऱ्यांनी ही पर्स ताब्यात घेतली. सुपुर्दनामा बनवून प्रवाशाच्या ताब्यात दिली. तेलंग यांनी ड्युटी संपूनही सात लाखाचे दागिने असल्याने स्वतःच गाडी येईपर्यंत थांबून त्यांनी मदत केली. पोलिसांनी तत्परता दाखवल्याने महिलेला तिची पर्स मिळाली.

# किराणा दुकानाला आग लाखो रूपयाचे नुकसान...

**जनसंचलन/ लोणार**

शहरातील लोणी रस्त्यावरील खटकेश्वर नगरातील रुद्र किराणा दुकानाला आग लागून लाखो रुपयाचे नुकसान झाल्याची घटना ४ मे रोजी रात्री २ वाजे दरम्यान घडली. सदर घटनेची माहिती रात्री अवैधरित्या रेती करणाऱ्या वाहन चालकाने दिसल्याने त्याने आसपास राहत असणाऱ्या नागरिकांस दिली. माजी नगरअध्यक्ष भूषण मापारी, डॉ. के. आर. घुगे यांच्यासह, विद्युत कर्मचारी यानी नागरिकांच्या व पोलीसांच्या मदतीने आग आटोक्यात आणल्या शर्थीचे प्रयत्न करण्यात




आले. नगर परिषदचे अग्निशमन दलाला पाचरण करण्यात आले आगीवर नियंत्रण मिळविले परंतु किराणा दुकानातील ४ डी फ्रीजर, संगणक, टीव्ही, प्रिंटर, किराणा साहित्य असे जळून खाक झाल्याने लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे.

# संदलमध्ये वाद का सोडविले या कारणावरून केली लोखंडी रॉडने मारहाण...

**जनसंचलन/ मेहकर**

तु संदलमध्ये वादका सोडविले म्हणून लोखंडी रॉड ने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी २ जणांविरूध्द गुन्हा दाखल केल्याची घटना घडली. याबाबत असे की, डोणगाव बसस्थानकावर ४ मे रोजी सायंकाळी ६ वाजता फिर्यादी शेख रिजवान शेख चाँद वय २३ वर्ष रा. खामगाव हा त्याच्या मित्रा सोबत डोणगाव येथील बस स्टॉपवर आला असता यातील आरोपी बिलाल शहा मोहसिन शहा रा. डोणगाव याने फिर्यादी यासतु काल संदल मध्ये वाद का सोडविले असे म्हणून त्याने त्याच्या हातातील लोखंडी रॉडने यातील फिर्यादी याच्या उजव्या हाताच्या दंडावर मारहाण करुन जखमी केले व यातील आरोपी शेख समीर शेख अमीर रा. डोणगाव ता. मेहकर जि. बुलडाणा याने ही फियार्दी यास लाथा बुक्यांनी मारहाण केली.अशा फिर्यादीच्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द कलम ३२३,३२४,३४ भादवीनुसार गुन्हा




दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार अमरनाथ नागरे यांचे आदेशाने सदर गुन्ह्याचा तपास नापोकाँ सतिष मुळे यांच्याकडे देण्यात आला.

# अश्लिल व्हिडीओ व्हायरलची धमकी देवून महिलेकडून २ लाख घेवून जीवे मारण्याची दिली धमकी...

**जनसंचलन/ खामगाव**

महिलेच्या मोबाईलमधून तिच्या मित्रासोबतचे अश्लिल व्हिडीओ ओळखीच्या महिलेने आपल्या मोबाईलमध्ये घेवून व्हायरल करण्याची धमकी देत २ लाख रुपये उकळले. तसेच तिच्या मालकीची शेती बळकविण्याच्या उद्देशाने तिने व पतीने पीडितेच्या दोन्ही मुलांना जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना स्थानिक शहर पोस्टेच्या हद्दीत उघडकीस आली आहे. याबाबत शहरातील एका वस्तीतील पीडित महिलेने शहर पोस्टेला तक्रार दिली की,ओळखीतून एका महिलेने आपल्या मोबाईलमध्ये तिचे मित्रासोबतचे अश्लिल व्हिडीओ घेतले. काही दिवसानंतर हे व्हिडीओ व्हॉयरल करण्याची धमकी देत ओळखीतील महिला व तिचे पतीने ब्लॅकमेल करुन पीडितेकडून जून २०२२ मध्ये दोन लाख रुपये घेतले. बदनामीच्या भीतीने पिडीतेने २ लाख रुपये दिल्यानंतर आरोपींनी तिला त्यांच्या मोबाईल मधील व्हीडीओ डिलीट केल्याचे सांगितले. त्यानंतर परत पीडितेला ४ मे रोजी स्थानिक कॉटन मार्केटच्या गेटसमोर अडवून तुझे नावाची गावावर असलेली २ एकर जमीन आमचे नावावर कर नाहीतर तुला व तुझ्या मुलांना ट्रक खाली ढकलून मारेल अशी धमकी दिली. पिडितेने जमीन नावावर करुन



देण्यास नकार दिल्याने आरोपींनी संगणमत करुन पीडितेचे अश्लिल व्हिडीओ व्हायरल केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या तक्रारीवरुन शहर पोलिसांना एका वस्तीतील महिला व तिचा पती भारत मोरे यांचेविरुध्द भादंवि कलम ३८४, ५०६, ३४ सहकलम ६६ (ई) ६७ आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस करीत आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत इसम ठार...

**जनसंचलन/ शेगाव**

वरवट रोडवरील बानोले मळ्याजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत ३५ वर्षीय दुचाकीस्वार जागीच ठार झाल्याची घटना ४ मे रोजी रात्री ९.३० वाजता उघडकीस आली. शेगाव वरून वरवट रोडवरील गोळेगाव येथे बहिणीकडे शिवहरी पांडुरंग गावंडे वय ३५ हे पॅशन प्रो एम. एच. २८ डब्ल्यू १६२६ या क्रमांकाच्या दुचाकीने जात असताना अज्ञात वाहनाच्या धडकेने जागेवरच गतप्राण झाले. सदर घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन प्रेत सईबाई मोटे उपजिल्हा सामान्य गालयात आणलेहोते. या पॅशन प्रो दुचाकीस्वाराला अज्ञात वाहनाने चिरडल्या नंतर वाहन घटना स्थळावरून पसार झाले होते. मृतकाला




पत्नी, १ मुलगा, आई, वडील, १ भाऊ व २ बहिणी असा बराच मोठा आप्त परिवार आहे. या मार्गावर नेहमीच रेतीचे टिप्पर भरधाव वेगाने धावतात तर यापूर्वी अनेकांना आपला जीव गमवावे लागले आहेत. पंधरा दिवसांपूर्वी वरखेड येथील इसमाला अपघातात मृत्यू झाला होता तर भोनगाव येथील एका युवतीला रेतीच्या वाहनाने कट मारल्याने गतप्राण व्हावे लागले होते. अशा अनेक अपघाताच्या घटना शेगाव - वरवट मार्गावर होत असून याकडे महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्ह्यात वाढली उष्णतेची लाट रसवंती वर रस पिण्यासाठी वाढली गर्दी...

## घराबाहेर पडताना टोपी किंवा रुमाल बांधून पडावे बाहेर





**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यात उष्णतेची लाट वाढलेली आहे. दि ५ मे रोजी जिल्ह्यात तापमान ३८ एवढे होते. प्रचंड ऊन तापत असल्याने जिल्हा वासियांना उष्णतेचा त्रास जाणवत आहे. विशेष या महिन्यात लग्नसराईच्या तारखा दाट आहे आणि त्यामध्ये उष्णतेचा तापमानाचा काटा वाढत चाललेला आहे. सध्या जिल्ह्यामध्ये जिकडे बघावे तिकडे नागरिक टोपी व रुमाल बांधूनच बाहेर पडत आहे. आणि बाहेर पडल्यानंतर थंड पाण्याचा गारवा घेण्यासाठी लोकांनी रसवंतीला पसंती दिली आहे. शहरासह आजूबाजूला असलेल्या रसवंतीवर नागरिक यांची गर्दी जमत आहे उसाचा थंड रस पिल्याने थंड गारवा हा नागरिकांना जाणवत आहे. तरी बाहेर पडताना विशेष काळजी घेऊनच बाहेर पडावे टोपी रुमाल बांधूनच बाहेर निघावे जेणेकरून उष्णतेचा त्रास काही प्रमाणात कमी जाणवेल. उष्णतेचा त्रास हा मानवासह जनावरांना सुद्धा प्रचंड प्रमाणात जाणवत आहे.उन्हाची तीव्रता वाढताच, जनावरांनाही उष्माघाताचा फटका बसण्याची शक्यता बळावली आहे. विशेषतः दुभत्या जनावरांना याचा धोका अधिक आहे. त्यामुळे कडक उन्हापासून जनावरांचा बचाव करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले. गेल्या काही दिवसांपासून वातावरणात वेळोवेळी बदल होत आहे. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून कमाल तापमान ४० अंशांच्यावर गेले आहे. मे महिन्यात तापमान आणखी वाढू शकते. वातावरणातील उष्णता कायम आहे. त्यामुळे नागरिकांप्रमाणेच पशुंच्याही शरीराचे तापमान संतुलित ठेवण्यासाठी पशुपालकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले.जनावरांना ऐन दुपारच्या वेळेत मोकळे सोडल्यास किंवा त्यांना बांधलेल्या ठिकाणी उन्हाचा त्रास जाणवणार नाही याची प्राथमिक सध्या जिल्ह्याच्या तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.


# घरफोडी, प्राण्यांसह दुचाकी चोरणारी टोळी



**जनसंचलन/ संग्रामपूर**

गेल्या काही दिवसांपासून चोऱ्यांच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाल्याने ग्रामस्थ धास्तावले आहेत. ग्रामीण भागात विविध ठिकाणी दुकाने फोडणे, गुराढोरांसह असंख्य दुचाकींवर अज्ञात चोरट्यांनी हात साफ केला आहे. त्यामुळे संग्रामपूर तालुक्यात घरफोडी, पाळीव प्राणी, तसेच दुचाकी चोरी करणारी टोळी सक्रिय झाली आहे. सोनाळा पोलिस ठाणे हद्दीत सोनाळा येथील गजानन अंबुस्कर यांच्या मालकीची एमएच २८ एएक्स २२२८ क्रमांकाची दुचाकी बसस्टँडच्या मुख्य रस्त्यालगत भरवस्तीतून ४ फेब्रुवारी रोजी चोरीला गेली, तसेच सोनाळा येथेच २१ मार्च रोजी सकाळी चोरट्यांनी रिवाइंडिंगचे दुकान फोडून ५७ हजार रुपये किमतीचे शेतीपंप लंपास केले. ही घटना मुख्य रस्त्यावरील जिल्हा परिषद मराठी मुलांच्या शाळेलगत ग्रामपंचायतीच्या कॉम्प्लेक्समध्ये घडली. यातील १० व ११ क्रमांकाचे मोटर रिवाइंडिंग दुकान व ऑटो गॅरेज दुकान अज्ञात चोरट्यांनी फोडले होते. त्या अज्ञात चोरट्यांचा शोध पोलिसांना अद्यापही लागला नाही, तसेच तामगाव पोलिस ठाणे हद्दीत ग्राम काटेल येथील अनिल गोविंद कुकडे यांच्या मालकीची एमएच २८ बीई ३२४८ क्रमांकाची दुचाकी २८ सप्टेंबर २०२३ रोजी चोरी गेली. येथीलच भगवान काशीराम कुकडे यांच्या मालकीची दुचाकी लंपास केली.

# आठवडी बाजारात मोबाइल चोरट्यास रंगेहात पकडले...



**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

आठवडी बाजारात मोबाइल चोरणाऱ्या आरोपीला मोठ्या शिताफीने पोलिसांनी पकडून मोबाइल हस्तगत केले. ही घटना ४ मे रोजी दुपारी घडली. देऊळगाव राजा शहरात आठवडी बाजारात गणेश कोंडीबा खांडेभराड (रा. समता कॉलनी, देऊळगाव राजा) हे चप्पलच्या दुकानात दुकानदाराचे पैसे देत असताना शर्टच्या वरच्या खिशातील मोबाइल आरोपीने लंपास केला. मोबाइल लंपास केल्यानंतर त्याने पळ काढला. बाजारात ड्यूटीवर असलेल्या पोलिसांनी आरोपीला पकडले व त्याच्या हातातील थैलीची पाहणी केली असता थैलीमध्ये खांडेभराड यांचा मोबाइल आढळला. याव्यतिरिक्त विविध कंपन्यांचे मोबाइल एकूण किंमत २९,००० रुपयांचे चोरी केलेले मोबाइल जप्त केले. आरोपी कृष्णा सर्जेराव जाधव रा. नाळवंडी नाका जिल्हा बीड याला अटक केली आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# चालकाला लागली डुलकी, कार ट्रकवर आदळली

## समृद्धी महामार्गावरील घटना : पाच जखमी...

**जनसंचलन/दुसरबीड**

समृद्धी महामार्गावर चालकाला डुलकी लागल्याने भरधाव कार समोरील ट्रकवर आदळली. यामध्ये पाच जण जखमी झाले. ही घटना ५ मे रोजी सकाळी घडली. जखमींना तातडीने सिंदखेड राजा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. साजीत शेख (रा. पुणे) हे कार क्रमांक एमएच १२ केएन ४४४६ ने पुणे येथून नागपूरकडे जात होते. दरम्यान, चॅनल नंबर ३३८.२ वर चालकाला डुलकी लागली. त्यामुळे कारने समोरील आयशर ट्रकला धडक दिली. या अपघातात साजिद शेख, बुर खा, नाईमुनीया, जयेश मोहम्मद, फैयाज खान (सर्व राहणार पुणे) हे किरकोळ जखमी झाले आहेत. अपघात झालेली दोन्ही वाहने महामार्गाच्या मधोमध आली होती. त्यामुळे तत्काळ महामार्ग पोलिस,




महाराष्ट्र सुरक्षा बल कर्मचारी यांनी त्वरित वाहतूक थांबवून जखमींना क्यूआरव्ही टीमच्या मदतीने वाहनांच्या बाहेर काढून मदत केली. सर्व जखमींना तातडीने सिंदखेड राजा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.घटनास्थळावर सिंदखेड राजा पोलिसांनी भेट दिली होती. अपघातग्रस्त वाहने टोल प्लाझावर लावण्यात आली आहेत.

# अनैतिक संबंधात अडसर,पत्नीचा मास्टरमाईंड प्लॅन,मित्रांच्या साथीनं पतीला संपवलं...



वृत्तसंस्था/ अमरावती

अनैतिक संबंधात अडसर, पत्नीचा मास्टरमाईंड प्लॅन, मित्रांच्या साथीनं पतीला संपवलं, अमरावती: मागील काही दिवसांपूर्वी कठोरा गांधी रस्त्यावर एका नाल्यात कुजलेल्या अवस्थेत सापडलेल्या मृतदेहाबाबत पोलिसांनी चौकशी केली. त्यातून लव्ह, सेक्स, पेशम आणि धोका असे सूत्र असलेली मर्डर मिस्ट्री समोर आली. प्रेमप्रकरणात अडसर ठरलेल्या माजी सैनिक पतीची त्यांच्या पत्नीने कट रचून मित्रांच्याच मदतीने हत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. भारतीय सैन्यातून निवृत्त झालले माजी सैनिक तथा सद्या रेल्वेत नोकरीला असलेले मिलिंद सौदागर वाघ (४२) असे मृतकाचे नाव आहे. नांदगाव पेठ पोलिसांनी एका महिलेसह ३ युवकांना याप्रकरणी अटक केली आहे.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतक मिलिंद हे भारतीय सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर भारतीय रेल्वेमध्ये उदखेड येथे रेल्वेगेटवर गार्ड म्हणून काम करत होते. त्यांना सेनेची पेन्शन आणि रेल्वेचा पगार होता. परंतु, काही महिन्यांपासून त्यांची पत्नी राहते घर आणि पेन्शन नावाने करून घटस्फोट देण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणत असे. याच कारणांवरून वाद वाढल्याने माजी सैनिकांची पत्नी तिच्या प्रियकरासोबत राहत होती. मृतक मिलिंद हे त्यांचा लहान भाऊ प्रशांत सौदागर वाघ (३२) यांच्याशी नेहमी संपर्कात राहत. आपल्या पत्नीकडून होणाऱ्या त्रासाबाबत त्यांना सांगत असे.अशातच १६ पासून एप्रिलपासून मिलिंद यांचा फोन लागत नसल्याने प्रशांत वाघ हे अमरावतीत त्यांच्या घरी आले. सर्वत्र शोध घेऊन ते न दिसल्याने अखेर प्रशांत वाघ यांनी याबाबत गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली. गाडगेनगर पोलिसांनी मिलिंद यांची शोधमोहीम सुरू केली. काही दिवसांपूर्वी नांदगावपेठ पोलिसांना कठोरा गांधी मार्गावरील एका शेतालगत असलेल्या नाल्यामध्ये अज्ञात मृतदेह आढळून आला. प्रशांत यांना मिलिंद यांच्या मृतदेहा-ची ओळख पटली. त्यांनी नांदगावपेठ पोलीस स्टेशनमध्ये पत्नीविषयी हत्येची तक्रार दिल्यानंतर पोलिसांच्या तपासात एक भयानक हत्याकांड समोर आले आहे.आरोपी महिलेने पेन्शन आणि घर नावाने करून देण्यासाठी आणि त्यानंतर घटस्फोट देण्यासाठी मिलिंद वाघ यांच्याकडे तगादा लावत दबाव निर्माण केला. मिलिंद यांचे दुसऱ्या महिलेसोबत सुत जुळले असून ते तिच्या नावाने पेन्शन करून देवू शकतात, असा संशय आरोपी महिलेला होता. आरोपी संकेत शुभम आणि कार्तिक हे तिघेही नेहमी मिलिंद यांच्यासोबत दारू पित होते. त्यामुळे पत्नीने तिघांना सोबत घेऊन मिलिंद यांच्या हत्येचा कट रचल्याचे पोलीस तपासात समोर आले. १८ एप्रिलला तिन्ही आरोपींनी मिलिंद यांना दारू पिण्याच्या बहाण्याने कठोरा गांधी मार्गावर नेले. त्यांच्यावर धारधार शस्त्राने वार करून त्यांची हत्या करून आकस्मिक मृत्यूचा बनाव आणण्यासाठी आरोपींनी मिलिंद यांचा मृतदेह शेतालगतच्या नाल्यात फेकून दिला.या संपूर्ण बाबी तपासात उघड झाल्यावर नांदगावपेठ पोलिसांनी मिलिंद वाघ यांच्या आरोपी पत्नीसह संकेत अशोकराव बोळे (२९), कार्तिक मुरलीधर कडूकर (१९), शुभम देविदास भोयर (१९) यांना ताब्यात घेत अटक केली. पोलिसांनी कारवाई सुरू करताच आरोपींनी मिलिंद वाघ यांच्या हत्येची कबुली दिली. पत्नी आणि ३ युवक असे चार आरोपी सध्या पोलीस कोठडीत असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# भरस्त्यात गाडी अडवून,तिघांनी लुटले!...

जनसंचलन/बुलढाणा

दुचाकीवरून तिघांनी मालवाहू गाडी अडवून मोबाईल आणि पाकीट चोरी केल्याची धक्कादायक घटना शनिवार ४ मे रोजी सकाळी धाडनाका- देऊळघाट मार्गानजीक घडली आहे. दरम्यान, तक्रारीवरून बुलडाणा पोलिसांनी तिघा अज्ञात दुचाकीस्वारांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. प्राप्त माहितीनुसार, आकाश राजेंद्र परदेशी (२३ वर्ष) हे मालवाहू महिंद्रा पिकअप गाडीचे मालक आहेत. ते चालक अविनाश पाटील यांच्यासोबत तेलंगणा राज्यातील निजामाबाद येथून आंबे घेऊन पाचोरा येथे जाण्यास निघाले होते. दरम्यान आज सकाळी ४ वाजेच्या आसपास धाड नाक्यावरील आईस फॅक्टरीजवळ तिघा दुचाकीस्वारांनी त्यांचे वाहन अडविले. पिण्यासाठी पाणी पाहिजे, असा इशारा त्यांनी केला होता. त्यानंतर त्यापैकी एका जणाने गाडीचे गेट उघडून समोर ठेवलेला मोबाईल आणि पाकीट उचलले. पाकिटात १२०० रुपये




ठेवले होते. त्यानंतर तिघांनी तेथून बुलढाण्याच्या दिशेने पळ काढला. सदरची दुचाकी विना नंबरची होती, असे तक्रारीत म्हटले आहे. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# ज्वारी सोंगणीसाठी मजूर मिळेना!

जनसंचलन/मोताळा



यावर्षी शेतकऱ्यांनी उन्हाळी ज्वारीची मोठ्या प्रमाणात पेरणी केली होती. आता या पिकाची सोंगणी सुरू आहे. ज्वारी सोंगणीसाठी ४०० रुपये रोज मजुरी द्यावी लागत आहे. तरीही मजूर मिळत नसल्याने मोताळा तालुक्यातील शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. मोताळा तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी उन्हाळी ज्वारी पिकाची पेरणी केली होती सध्या ज्वारी पिकाची सोंगणी सुरू आहे. त्यात मजूर मिळत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. परिणामी, ज्वारी सोंगणी ही रोजंदारीने करावी लागत आहे. एकरी १० व्यक्ती सोंगणी करत असल्याने मजुरीही जादा द्यावी लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक काढणीला जास्त खर्च करावा लागत आहे. आधीच खरीप हंगामात अनेक पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटल्याने लागवडीसाठी लागलेला खर्चही निघालेला नाही

# प्रसुती ऑपरेशनवेळी अतिरक्तस्त्राव झाल्याने मृत्यू

जनसंचलन/ शेगाव

सीजर प्रसूती मध्ये अतिरिक्त रक्तस्राव झाल्याने उपचारा दरम्यान शेगाव येथील ३९ वर्षीय महिलेचा सिल्व्हर सिटी हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाल्याची घटना २२ एप्रिल रोजी घडली. याबाबत माहिती देणार कक्ष सेवक गोपाल वाशिमकर तर्फे पो. कॉ. ऋषिकेश बढे यांनी मेमो सादर केला की, २२ एप्रिल रोजी संध्याकाळी ७. ३० वाजता शिंदे हॉस्पीटल शेगाव येथे सीजर प्रसुती झाल्याने मृतक सलतानत अंजुम अलीम खान वय ३९ वर्ष रा. अब्दुल हमीद चौक, शेगाव हिची परीस्थीती गंभीर



झाली होती. त्यानंतर तिला उपचारासाठी सिल्व्हर सीटी हॉस्पीटल खामगाव येथे दाखल केले असता मृतक हिचा अतिरक्त स्त्राव झाल्याने उपचारा दरम्यान मृत्यू झाला. अशा मेमो वरुन कलम १७४ नुसार मर्ग दाखल करण्यात आला आहे.

# विवाहितेचा छळ; पतीसह ४ जणांवर गुन्हा...

जनसंचलन/ सोनाळा

सोनाळा पोलिस स्टेशन हद्दीत पळसोळा हे गाव आहे. येथे एका विवाहितेचा पती व सासरच्या मंडळी कडून ५ लाख रुपयासाठी शारिरिक व मानसिक छळ केला व जीवे मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना २९ एप्रिल रोजी घडली. पिडितेच्या फिर्यादीवरून सोनाळा पोलीसांनी आरोपी विरुद्ध कलम ३०७, ४९८ (अ), ३२३, ५०४ भादंवि नुसार २ मे रोजी गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान पोलीसांनी दिलेल्या माहिती नुसार पळसोळा येथील वैशाली अनंता बाबुळकार या ३० वर्षीय विवाहितेने फिर्याद दिली. त्यात नमूद आहे की, सासरच्या मंडळीनी माहेरवरून ५



लाख रुपये आणण्यासाठी छळ करीत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच गळा दाबून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आरोपी पती अनंता शंकर बाबुळकार, सासू बेबाबाई शंकर बाबुळकार, योगेश शंकर बाबुळकार दिर, सौ. लक्ष्मी महादेव कळमकार विरुद्ध उपरोक्त कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहेकॉ विशाल गवई हे करित आहेत.